आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१ जुलै२०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारत जी राम जी कायदा आजपासून देशभरात लागू

- व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात १८३ रुपये ५० पैशांची कपात

- महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची एकमताने निवड

- ज्येष्ठ रंगकर्मी आणि दिग्दर्शिका विजया मेहता यांचं निधन, मान्यवरांची आदरांजली

**आणि**

- राजस्थान आणि उत्तर प्रदेशात झालेल्या रस्ते अपघातात १२ जणांचा मृत्यू, १२ पेक्षा जास्त जखमी

<><><><><>

रोजगाराची हमी देणारा विकसित भारत जीरामजी अर्थात विकसित भारत- रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा २०२५ आजपासून देशाच्या ग्रामीण भागात लागू होत आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतनासह रोजगाराची हमी देणारा हा कायदा ग्रामीण भारताला सक्षम करेल, असा विश्वास ग्रामविकास मंत्रालयानं व्यक्त केला आहे. याच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ९५ हजार ६९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विहित मुदतीत काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद नव्या कायद्यात आहे. हा कायदा जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणार आहे. पात्र कामगारांना दररोज रोजगार मिळवा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या समन्वयातून सर्व तयारी पूर्ण केली आहे, असं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

भारतामध्ये डिजिटल इंडिया उपक्रमाने गेल्या ११ वर्षांत देशभरातील नागरिकांच्या एकमेकांशी जोडले जाण्याच्या, शिकण्याच्या, व्यवहार करण्याच्या आणि सार्वजनिक सेवा मिळवण्याच्या पद्धतींना आकार दिला आहे. तसंच जगातील सर्वात मोठ्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा परिसंस्थांपैकी एक परिसंस्था उभी केली आहे. डिजिटल

प्लॅटफॉर्मने विशेषतः ग्रामीण भागामध्ये आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य विकास, कृषी आणि कल्याणकारी सेवांचा विस्तार केला आहे. भारताने इंडिया स्टॅक आणि DPI प्रणालींवर सहकार्यासाठी २४ देशांसोबत सामंजस्य करार केले आहेत, ज्यामध्ये डिजिटल ओळख, पेमेंट, डेटाची देवाणघेवाण आणि सेवा वितरण यांचा समावेश आहे. आता UPI प्रणाली UAE, सिंगापूर, फ्रान्स, मॉरिशस आणि श्रीलंका यांसह आठहून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे.

**<><><><><>**

पेट्रोलियम कंपन्यांनी आजपासून १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती १८३ रुपये ५० पैशांनी कमी केल्या आहेत. त्यामुळे दिल्लीत हा सिलेंडर दोन हजार ९३० रुपयांना मिळेल. या कपातीमुळे हॉटेल्स, कँटीन तसेच इतर संबंधित व्यवसायांना दिलासा मिळणार आहे.

**<><><><><>**

पारपत्र दुरुस्ती नियम २०२६ नुसार आजपासून नवीन ३६ पानांचं पारपत्र काढण्यासाठीचं शुल्क वाढवून अडीच हजार रुपये करण्यात आलं आहे. ६० पानांचं पारपत्र हवं असल्यास साडेतीन हजार रुपये तर तात्काळ योजनेअंतर्गत पारपत्रासाठी सहा हजार रुपये शुल्क द्यावं लागणार आहे.  ३६ पानी पारपत्र खराब झाल्यास किंवा हरवल्यास ते नवीन बनवून घेण्यासाठी ५ हजार रुपये, तर ६० पानी पारपत्रासाठी सहा हजार रुपये शुल्क ठेवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची आज एकमताने निवड झाली. ही नियुक्ती निवडणूक होऊन नाही, तर एकमताने होणं ही या सभागृहाची परंपरा असून ती यंदाही तशीच व्हावी, असं सांगून महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांनी आपला अर्ज मागे घ्यावा, अशी विनंती संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली, त्यानुसार अर्ज मागे घेतल्याची घोषणा अभिजित वंजारी यांनी केली. त्यानंतर आवाजी मतदानाने सचिन अहिर यांची एकमताने उपसभापती म्हणून निवड झाली.

**<><><><><>**

PCPNDT कायद्यांतर्गत, IVF सेंटर, सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत

प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ठाणे जिल्ह्यात बदलापूरमध्ये झालेल्या स्त्री बीज तस्करी प्रकरणी ते बोलत होते. यावेळी त्यांनी IVF सेंटर आणि सिझेरियन प्रसुतीबाबत चिंता व्यक्त केली आणि या केंद्रांना परवानगी देताना काळजी घेण्याच आश्वासन दिलं. राज्यातली डॉक्टरांची रिक्त पदं भरण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

सुप्रसिद्ध नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शिका विजया मेहता यांचं काल रात्री त्यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. विजयाबाई या नावाने त्या कलावर्तुळात सुपरिचित होत्या. मराठी प्रायोगिक नाट्यचळवळीचा पाया त्यांनी घातला होता. नाट्यदिग्दर्शनात त्यांनी नवीन जागतिक विचार तसेच नवीन आयाम जोडले. त्यांनी दिग्दर्शित केलेली बॅरिस्टर, सखाराम बाईंडर, हमीदाबाईची कोठी, महानिर्वाण, पुरुष, हयवदन, वाडा चिरेबंदी, इत्यादी नाटकांनी मराठी रंगभूमीवर इतिहास घडवला. रावसाहेब, पेस्तनजी यासारख्या चित्रपटांमधून तसेच स्मृतिचित्रे सारख्या मालिकेतून त्यांनी दूरदर्शन पटांवर देखील आपला ठसा उमटवला होता. आपल्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक चित्रपट - नाट्यकलाकारांना घडवलं, मोठं केलं. त्यांच्या या योगदानाबद्दल १९७५ सालचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार त्यांना मिळाला होता, तर १९८६ साली रावसाहेब या चित्रपटातल्या भूमिकेबद्दल त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

आधुनिक मराठी नाट्यसृष्टीच्या शिलेदार आणि नाट्यक्षेत्रातल्या उत्कृष्टतेप्रती अमिट निष्ठा ठेवणाऱ्या नाट्यकर्मी आपण गमावल्या आहेत असं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमवरच्या आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

रंगमंच आणि पडद्यावरील नावाजलेला चेहरा आणि मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ निर्मात्या, दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.  एका पिढीचे प्रतिनिधित्व करणारा एक चेहरा त्यांच्या निधनाने काळाच्या पडद्याआड गेला आहे, या शब्दात त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनीही विजया मेहता यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

राजस्थानमध्ये दौसा जिल्ह्यात दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्गावर ट्रक आणि प्रवासी बसशी धडक होऊन झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला तर १२ पेक्षा जास्त जण जखमी झाले. ऋषिकेशहून इंदूरच्या दिशेने जाणारी ही बस आज पहाटे तीन वाजण्याच्या सुमाराला एका ट्रकला धडकल्यामुळे तिला आग लागली. जळत्या बसमध्ये अडकलेल्या काही प्रवाशांना बाहेर पडण्याचा मार्ग न मिळाल्यामुळे ते मृत्युमुखी पडले. जखमींना दौसा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. बहुतांश प्रवासी मध्य प्रदेश आणि ऋषिकेशचे रहिवासी असल्याचं पोलिसांनी कळवलं आहे. अपघाताचं कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला असून मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.

उत्तर प्रदेशात आग्रा-लखनौ महामार्गावर आज पहाटे प्रवासी बस आणि गाडीची धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. ही बस हरयाणाकडून बिहारकडे जात होती. तर गाडी आग्र्याहून लखनौच्या दिशेने जात होती. भरधाव वेगात असलेल्या बसची कारशी धडक झाल्यानंतर बस महामार्गावरून खाली कोसळली आणि उलटली. या अपघातातल्या गंभीर जखमींना बांगरमऊ इथल्या आरोग्य केंद्रात आणि जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शहरात गेल्या २४ तासात १०० मिलीमीटर पाऊस झाल्यामुळे अनेक सखल ठिकाणी पाणी साठलं असून उपनगरी रेल्वेगाड्या उशिराने धावत आहेत. पाणी साठल्यामुळे रस्ते वाहतुकीचे मार्ग काही ठिकाणी बदलण्यात आले आहेत. बेस्ट बससेवा तुलनेने वेळेवर धावत आहे. हार्बर रेल्वेमार्गावर आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ओव्हरहेड वायर तुटल्यामुळे तिथली रेल्वेसेवा विस्कळीत  झाली होती. पूर्व उपनगरात गेल्या २४ तासांमध्ये १०९ मिलीमीटर पाऊस पडला असून मानखुर्द उपनगरात सर्वाधिक १७० मिलीमीटर पाऊस पडला आहे. पश्चिम  उपनगरांमध्ये ८७ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. आज दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास समुद्राला मोठी भरती आहे. भरतीच्या काळात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या राऊंड ऑफ ३२ सामन्यात मेक्सिकोनं इक्वॅडोरचा २-० असा पराभव करून अंतिम-१६ मध्ये प्रवेश केला. मेक्सिकोच्या राऊल जिमेनेझ आणि

ज्युलियन क्विनोन्स यांनी प्रत्येकी एक गोल केला. आता अंतिम-१६ मध्ये मेक्सिकोचा सामना इंग्लंड किंवा कांगो यांच्यापैकी एका संघाशी येत्या रविवारी होणार आहे.

दुसऱ्या सामन्यात, फ्रान्सनं स्विडनला ३-० असा सहज पराभूत करून अंतिम-१६ मध्ये धडक मारली. किलियन एम्बाप्पे याने दोन गोल करत विश्वचषकात आपल्या कारकिर्दीतील गोलसंख्या १८ वर नेली. त्यामुळे तो मेस्सीच्या विश्वचषकातल्या गोल संख्येपेक्षा केवळ एका गोलनं मागे आहे.

दरम्यान, नॉर्वेनं आयव्हरी कोस्टवर २-१ असा विजय मिळवत अंतिम-१६ मध्ये प्रवेश केला. याशिवाय मोरक्को, पॅराग्वे, ब्राझील आणि कॅनडा यांनीही आपापले सामने जिंकत अंतिम-१६ मध्ये स्थान निश्चित केलं.

<><><><><>

आज राष्ट्रीय डॉक्टर दिवस. या निमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी देशभरातल्या डॉक्टरांना समाजमाध्यमाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. मानवतेच्या सेवेसाठी डॉक्टरांनी दाखवलेली निष्ठा, संवेदनशीलता, कौशल्य आणि कटिबद्धता यांची त्यांनी प्रशंसा केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही देशातील डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. डॉक्टरांची कठोर मेहनत, संवेदनशीलता आणि निष्ठा हा भारताच्या आरोग्यसेवेचा कणा आहे. असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनीही देशभरातल्या डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या आहेत.

//<><><><><>//